

# हि त गु ज

## २०२4 गुढीपाडवा विशेषांक
## मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा





**मराठी मंडळ कमिटी**
**२०२२-२०२४**

**अध्यक्ष:**
अमिता पेणकर

**उपाध्यक्ष:**
विशाखा कोकाटे

**कोषाध्यक्ष:**
नैना शिरोडकर

**सांस्कृतिक सचिव:**
केतन कुलकर्णी
मिथुन जाधव
अश्विनी भोसले

**संपर्क सचिव:**
प्रविणा पाठक
महेश चिमणपुरे

**शाळा सचिव:**
मृदुला वडके

**हितगुज संपादिका:**
अवनी सावरकर-शेंड्ये
अदिती बिस्वास

स्टेगेरिंग कमिटी 2023-2025

**सांस्कृतिक सचिव:**
प्रमिला जाधव

**संपर्क सचिव:**
स्नेहल मुळे

मुखपृष्ठ चित्र : अंजली भुरे

संपादकीय: अवनी सावरकर-शेंड्ये, अदिती बिस्वास

गोष्ट माझ्या क्लासची!! : अमरजा बाबतीवाले
त्या पैलतीरावर मिळेल मजला थारा...: अमोल दांडेकर
ओये, आग्वा! : वासंती मुदकण्णा
शाबासकीची थाप : स्वामिनी बाबतीवाले
पहाट पाऊल : ऋचा सावरकर
गोष्ट नर्मदालयाची : शिल्पा साठे


माझी कविता:
पहिला पाऊस : प्रविणा पाठक
नातं तुझं माझं : रसिका राऊत
अलगूज : जयश्री मुळे
बेघर : वासंती मुदकण्णा

उत्सव माझ्या दारी: अमरजा बाबतीवाले
Northern Lights: नितीन मुळे

मराठी शाळा: मृदुला वडके

छोट्यांच्या दुनियेत : आरव गुंड , आर्या पाठक

कार्यक्रम छायाचित्र सौजन्य : नितिन मुळे







# संपादकीय

अवनी सावरकर-शेंड्ये

अदिती बिस्वास

नमस्कार मंडळी!

Minnesota च्या आपल्या सर्व रहिवाश्यांना वसंत ऋतूची आणि त्या पाठोपाठ येणाऱ्या उन्हाळ्याची किती उत्सुकता असते हे वेगळे सांगायला नकोच. अर्थात या वर्षीचा हिवाळाही आल्हाददायी होता. Snow shovel करावे लागले नाही म्हणून जितके बरे वाटले तितकेच पर्यावरणाच्या बदलत्या रूपाचा विचार करून मन उदासही झाले. तेव्हा मदतीला आला हितगुजचा हा Spring २०२४ चा अंक आणि त्यासाठीची लगबग! दरवर्षीप्रमाणेच यंदाही तुम्ही दिलेल्या प्रतिसादासाठी मनापासून धन्यवाद!

या अंकात तुम्हाला विविध छटांचे लेख आणि कविता वाचायला मिळतील. अमरजाने निसर्गाच्या कुशीत बसून घेतलेला जपानी भाषेचा वर्ग आपल्याला नेहमीपेक्षा काही वेगळे करून बघायला प्रवृत्त करेल तर अमोलची संगीतकार नरेंद्र भिंडे यांना वाहिलेली शब्दांजली नकळत आपल्याला जुन्या आठवणीत रमवेल. वासंती यांनी त्यांच्या निकराग्वाच्या प्रवासातले खुमासदार अनुभव 'ओये, आग्वा!' या लेखात लिहिले आहेत. स्वामिनी काकूंचा 'शाबासकीची थाप' हा लेख लक्षात राहतो तो त्यांच्या हळुवार आणि नकळत डोळे भरून येतील अशा शब्दातल्या अनुभवांमुळे! ऋचा काकूंनी लिहिलेला 'पहाट पाऊल' हा लेख तुम्हाला नक्कीच रोजच्या गतीमान आयुष्यातून दोन विसाव्याचे क्षण शोधायला प्रवृत्त करेल. शिल्पाचे 'गोष्ट नर्मदालयाची' या पुस्तकाचे वर्णन वाचून तुमच्या पुस्तकांच्या यादीत एक भर नक्की!

या सर्व उत्तम लेखांसोबत तुम्हाला प्रविणा, रसिका, वासंती, आणि जयश्री काकूंच्या कविताही वाचायला मिळतील. त्याचबरोबर लोकप्रिय अशी माझी पाककला, उत्सव माझ्या दारी, छोट्यांच्या दुनियेत, चित्रकला अशी सदरे आहेतच! आपल्यापैकी जे मे महिन्यात दिसलेले Northern lights बघायला जाऊ शकले नाहीत, त्यांच्यासाठी नितीनने त्याची काही सुंदर छायाचित्रे अंकात दिली आहेत!

असा हा विविध अनुभवांनी नटलेला अंक सादर करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. आशा आहे तुम्हालाही वाचताना तेवढाच आनंद मिळेल! तुमच्या अभिप्रायाची वाट बघतोय.



# गोष्ट माझ्या क्लासची!!

लहानपणी घर-घर नंतर जर कोणता आवडता खेळ असेल तर तो म्हणजे शाळा-शाळा!! शाळेतल्या बाईंसारखे मी घरी येऊन शिकवत असे. आई बाबांनी फळा- खडू आणि duster आणून माझ्या आवडीला प्रोत्साहन दिले होते. माझ्या पहिलीच्या वर्गशिक्षिका गौरी साठे बाईंसारखी (आईच्या ओढणीची) साडी नेसून, पर्स घेऊन मी माझ्या 'वर्गात' येत असे. बाईंचे केस मोठे होते त्यामुळे त्यांच्यासारखे दिसण्यासाठी मी गंगावन लावायचे. इतकेच काय तर शाळेत त्यांच्या duster वर त्यांचे नाव लिहिलेले असायचे म्हणून मी घरच्या duster वर "गौरी साठे १ ली ई" असे लिहून घेतले होते. माझ्या घरातल्या शाळेत दोनच विद्यार्थी असायचे. सगळे ऐकणारी एकदम शहाणी विद्यार्थिनी म्हणजे आई आणि सांगितले आहे त्याच्या अगदी उलट करणारा खट्याळ विद्यार्थी म्हणजे बाबा!! स्वयंपाक घराच्या passage मध्ये भरणारी आमची ही शाळा मला आणि माझ्या पहिल्या विद्यार्थ्यांना अजूनही आठवते.

पुढे कितीतरी वर्षांनी जपानी भाषेत BA करत असताना माझ्या शिक्षकांनी मला जपानी शिकवण्याची संधी दिली. शिकवण्याचा हा अनुभव मला आवडला होता. अमेरिकेत आल्यानंतर परत जपानी शिकवायला सुरु करावे असे अनेकदा वाटायचे. बरेच प्रयत्न केल्यावर या वर्षी जवळच्या एका शाळेत जपानीची तोंडओळख असे क्लास घ्यायची संधी मिळाली. ऑनलाईन शिकवण्याचा नवीन अनुभव घेत आठवड्यातून दोनदा संध्याकाळी दीड तास असे माझे क्लासेस सुरु झाले.

प्रत्येक क्लास/बॅच कोणत्या ना कोणत्या कारणाने शिकवणाऱ्याच्या लक्षात राहते असे म्हणतात तसेच माझ्यासाठी पण हा क्लास एका वेगळ्या कारणाने लक्षात राहील. त्याचीच ही गोष्ट –

क्लास सुरु होऊन २ आठवडे झाले असतील तेव्हा एक दिवस संदीप ने मला सांगितले कि बॅग भर आपल्याला दोन दिवसांसाठी कुठेतरी जायचे आहे. दुपारी निघू. काहीतरी surprise आहे या विचाराने मी एकदम खुश झाले आणि अचानक आठवले अरे पण आज माझा क्लास आहे संध्याकाळी. त्यानंतर जायचे का?

झाले असे होते कि त्याने बरेच दिवस आधी केबिन चे बुकिंग केले होते. Fall season सुरु होतो तसा अंधार लवकर पडायला लागतो त्यामुळे दुपारी निघून तिकडे बार्बेक्यू करून केबिन enjoy करायचा त्याचा प्लॅन होता आणि माझ्यासाठी surprise!! एवढ्या short notice वर मी क्लास रद्द पण करू शकत नव्हते. जंगलात बांधलेल्या टुमदार लाकडी घरात राहण्याचा आमचा पहिलाच अनुभव असणार होता, पण state parks मध्ये बरेचदा नेटवर्क नसते हे पक्के माहित होते. शेवटी तो म्हणाला कि जाताना बघू जिथे range असेल तिथून तू क्लास घे.

नेहमी लॅपटॉप वर ppt- screen share करत २-३ वह्या- पुस्तकांच्या मदतीने क्लास घेणारी मी आज मोबाईल वर कसे जमेल असा विचार करत घरातून निघाले. जाताना वाटेत कुठे मॉल वगैरे पण दिसत नव्हता आणि destination च्या १५-२० मिनिटे अंतरापासूनच range ची एक-एक 'काडी' कमी होत होती. अखेरीस आम्ही आमच्या केबिन जवळ पोचलो. ते छोटेसे घर पाहून जेवढा आनंद झाला तेवढाच इथे थोडीशीतरी range आहे हे पाहून झाला. कॉल लागत आहे का आवाज येत आहे का हे सारे चेक करण्यासाठी आम्ही एकमेकांना कॉल करून पहिला. कॉल लागत असला तरी आवाज नीट येत नव्हता. केबिन च्या आत,बाहेर,थोडे लांब सगळीकडे जाऊन चेक करून पहिले. दीड तासाच्या क्लास पैकी एक तास तरी नीट क्लास व्हावा अशी इच्छा होती. आणि तेवढ्यात एक विद्यार्थी क्लास च्या कॉल मध्ये जॉईन झाला.
माझा आवाज येतो आहे का? विचारल्यावर हो म्हणाला आणि मला हुश्श झाले. संदीप ला 👍🏻 करून माझा क्लास सुरु झाला. केबिन पासून काही अंतरावर चालत मी शिकवायला सुरुवात केली आणि कोणत्याही व्यत्ययाशिवाय ठरल्याप्रमाणे सगळे शिकवून झाले. मी घड्याळ पहिले तर क्लास संपायला ५ मिनिटे होती.

सूर्यास्त कधीच झाला होता. रातकिड्यांचा आवाज येत होता. हवेत चांगलाच गारवा जाणवायला लागला होता. एवढ्या कमी Range मध्ये सुद्धा दीड तासाचा कॉल होऊ शकतो यावर माझा विश्वास बसत नव्हता. मी बसले होते तिथून समोर मिट्ट काळोखात एक सुंदर लाकडी घर, बाहेर शेकोटी आणि शेजारी एक छोटी आणि एक मोठी सावली काहीतरी कामात आहेत असे दिसत होते. सगळीकडे बार्बेक्यू चा मस्त वास पसरला होता. काही क्षण ते दृश्य डोळ्यात साठवून मी केबिन कडे निघाले.

काहीतरी नवीन केल्याचा आनंद होता का काहीशा प्रतिकूल परिस्थितीत क्लास घ्यायला जमले याचे समाधान होते माहीत नाही पण हा हटके अनुभव माझ्यासाठी नक्कीच स्पेशल होता!! बापलेकाने माझ्यासाठी सजवून ठेवलेल्या डायनिंग टेबल इतकाच!!





**अमरजा बाबतीवाले**



# त्या पैलतीरावर मिळेल मजला थारा...

**संगीतकार नरेंद्र भिडेला दिलेली ही छोटीशी शब्दांजली!**

२०२० च्या १० डिसेंबरला संगीतकार नरेंद्र भिडे यांचं हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाल्याची बातमी कुठेतरी वाचली आणि मन सुन्न झाले. पुढचे चार-पाच दिवस खूप अस्वस्थतेत गेले, मनाला राहून राहून फार वाईट वाटत होतं. साहजिकपणे काही दिवस त्यांची गाणी ऐकण्यात गेले. हळू हळू करता थोडा विसर पडला आणि आपल्यातच रुळलो. ८-१० दिवसांपूर्वी फेसबुकवर कुणाचीतरी नरेंद्र भिडेला जाऊन वर्ष झालं म्हणून एक पोस्ट पाहिली आणि पुन्हा अस्वस्थ झालो. अशी बरीच माणसं असतात ज्यांना आपण कधीच भेटलेलो नसतो पण का कुणास ठाऊक? त्यांच्याशी एक नातं असत, त्या व्यक्तींबद्दल काही लिहून आलं तर ते आवर्जून वाचावंसं वाटतं, कुठेशी त्यांची मुलाखत असेल तर ती न चुकता बघावीशी वाटते. विनय आपटे, सुधीर जोशी, रसिका जोशी याचंही जाणं असच मनाला चटका लावणार होतं. विनय आपटे गेल्यावर कित्येक दिवस असं वाटायचं की असं कसं काय शक्य आहे? विनय आपटे कसा काय जाऊ शकतो? मन कितीतरी दिवस हे मानायलाच तयार नव्हतं की विनय आपटे आपल्यात नाही. नरेंद्र भिडेही अश्याच काही मंडळींपैकी एक. नरेंद्र भिडे हा माझ्या पिढीचा प्रसिद्धीपासून दूर असणारा पण एक उमदा संगीतकार! त्याचं मुख्य काम चित्रपटांचे, नाटकांच्या बॅग्राऊंड स्कोर (पार्श्व संगीत) आणि संगीत संयोजनाशी (म्युझिक अरेंजमेन्टशी) निगडित होतं. संगीतकार कवितेला किंवा गाण्याला चाल लावून मोकळा होतो आणि इथूनच संगीत संयोजकाचं काम सुरु होतं. थोडक्यात सांगायचं तर आर्किटेक्ट नी डिझाईन केल्याप्रमाणे घर बांधून झालं, पण आता त्याला सुशोभित करायचं काम जसं इंटेरियर डिझायनर करतो तसच संगीत संयोजक संगीतकाराने केलेल्या गाण्याला, त्या गाण्यात असलेल्या भावा प्रमाणे आणि गरजेनुसार विविध वाद्यांचा साज चढवतो आणि ते गाणं अधिक सुरेल करून खुलवायचं काम हा संगीत संयोजक करतो. ते काम नरेंद्र भिडे अतिशय उत्तम पद्धतीने करायचा. अनेक नाटकं आणि चित्रपटांच्या पार्श्व संगीतासाठी त्याला पारितोषिकं मिळाली होती. बरेचदा आठवत नाही म्हणून सांगतो म्हणजे चटकन लक्षात येईल. कॉसमॉस बँकेची ती प्रसिद्ध जाहिरात आठवते?

नाते अपुले शतकाचे,<br>
विश्वासाचे आपुलकीचे

त्या जाहिरातीचं संगीत नरेंद्र भिडेचं! काळानुरूप बदलत जाणारं कुटुंब आणि त्यानुरूप संगीतातही होत जाणारा बदल, त्यातून निर्माण होणारा परीणाम, ही जाहिरात साधते. जुन्या पिढीच्या मंडळींना, केवळ तीस सेकंदाची ही जाहिरातीत बोट धरून थेट आजोबां-आज्जी, काका-काकू आणि भावंडं, झोपाळा, ओसरी, पडवी आणि चौक असणाऱ्या भरल्या वाड्यात घेऊन जाते. नेमका हा अनुभव सगळ्या प्रेक्षकांना खूप सुखावणारा होता, जाहिरात थेट काळजाला हात घालते आणि हवा तो परिणाम साध्य करते. थोडक्यात या जाहिरातीने कॉसमॉस बँकेचं काम उत्तम केलं!

झी टीव्ही वर २००२-०३ च्या काळात अवंतिका मालिका खूप गाजली होती त्याचं शीर्षक गीतही (टायटल साँग) नरेंद्र भिडेचं. मी मालिका तर नाही पाहिली, कारण त्या काळी मी बॅचलर होतो. त्यामुळे टी व्ही शी संबंध कमी येई पण कधी मावशीकडे वैगेरे एखादा भाग पहिला असेल आणि त्याच्यात वाचलं होतं शीर्षक गीत 'नरेंद्र भिडे'. रोज वेळ झाली की आजुबाजुंच्या घरांमधून आवाज येई

सुख आणिक दु:ख यांना सांधते आहे
जीवनाशी ती कधीची भांडते आहे....

या शीर्षक गीताच्या रूपाने या संगीतकाराशी झालेली ही पहिली ओळख! तसंच ऊन पाऊस, नुपूर, श्रावणसरी या मालिका गीताचंही संगीत नरेंद्र भिडेचं. आता नाटकाकडे वळूया रंगभूमीवर अलिकडल्या काळात खूप गाजलेलं नाटक व्हाईट लिली आणि नाईट रायडर याचंही संगीत त्याचंच! त्यानंतर काटकोन त्रिकोण, चिरंजीव आईस, लव्ह बर्डस अश्या अनेक नाटकांना आणि जाहिरातींना त्यानी संगीत दिलं होतं.

नरेंद्र भिडे मला जीव की प्राण आवडायला लागला ते त्यानं कवी ग्रेसांच्या कवितेला लावलेल्या चालीमुळे.

या व्याकुळ संध्यासमयी
शब्दांचा जीव वितळतो,
डोळ्यांत कुणाच्या क्षितिजे
मी अपुले हात उजळतो

गाणं आवडतं, म्हणजे प्रथम चाल आवडते, निदान माझं तरी असं आहे. मग खूपदा ऐकून झालं की हळू हळू शब्दांकडे लक्ष जातं आणि जितका चालीच्या प्रेमात पडतो तेवढाच मग शब्दांच्या प्रेमात पडतो. हे गाणं पहिले-पहिले ऐकल तेव्हा ते ज्या पद्धतीनं गायलं आहे किंवा ज्या पद्धतीची चाल आहे त्यावरून ते प्रथम प्रथम विरह गीत वाटायचं पण मग शब्दांकडे लक्ष गेलं तेव्हा वाटलं की हे विरह गीत नाही तर अत्यंत रोमँटिक गीत आहे! आता कवितेचे अनेक इंटरप्रिटेशन असतात, काळ जातो तश्या अनेक कविता आधी वाटल्या त्यापेक्षा वेगळ्याही भासतात. डॅलसला असताना बाल्कनीत उभं राहून फुललेली सांज मी या गाण्याच्या संगतीने खूप एन्जॉय केली आहे. 'संध्या रंग' या कल्पनेचा शोधही मला इथेच लागला कदाचित. संध्या रंग थीमच्या अनेक कविता आणि गाण्यात या गाण्याचा नंबर खूप वरचा लागतो.

झी मराठी वाहिनी जेव्हा थोडं बाळसं धरू लागली होती त्या काळात सूर ताल नावाचा एक कार्यक्रम येई. कधी कोणाकडे गेलो किंवा नागपूरला घरी सुट्टीत गेलो तर लॉटरी लागावी तसा हा कार्यक्रम कधीतरी पाहायला मिळायचा. याचं "सूर-ताल" शीर्षक गीतही नरेंद्र भिडेचं. याच कार्यक्रमात ह्रिषीकेश रानडेचं एक गाणं ऐकल्याचं अंधुक अंधुक आठवतं. सूर ताल मध्ये फारच मोजकी वाद्य असायची पण ह्रिषीकेश रानडेनी हे इतकं जीव ओतून गायलं होतं की ते एकदम हृदयाला जाऊन भिडलं. अनेक वर्ष हे गाणं शोधत होतो अन कुठे मिळत नव्हतं, कदाचित विसरूनही गेलो होतो. पण शेवटी YouTube वर त्याचा नवीन अवतार मिळाला. अंगावर काटा आणणारे सुरेश भटांचे शब्द.

त्या पैलतीरावर मिळेल मजला थारा
सुहृदांची प्रेमळ सोबत आणि उबारा
इकडच्या तटावर झाले ध्वस्त निवारे
जळतात पावलांखाली क्रुद्ध निखारे
मी तळमळताही निर्विकार जन सारे
पण तिथे वाहतो प्रसन्न शीतल वारा!

पहिल्या कडव्याच्या पहिल्या दोन ओळी ह्रिषीकेशने काय गायल्या आहेत! खरंच अंगावर काटा येतो. या गाण्याची जातकुळी तीच आहे जी

भोगले जे दुःख त्याला, सुख म्हणावे लागले
एवढे मी भोगिले की मज हसावे लागले

पण या सुरेश भटांच्या या 'त्या पैलतीरावर मिळेल मजला थारा..." यात शब्दातून उमटलेला दाह जास्त बोचरा आहे.
मी तळमळताही निर्विकार जन सारे
पण तिथे वाहतो प्रसन्न शीतल वारा!

या ओळींमधला 'तळमळताही' यातला तळमळ भाव ज्या पद्धतीनेगायला आहे त्यासाठी ह्रिषीकेशला, असा विचार करून चाल बांधणाऱ्या नरेंद्र भिडेला आणि कवी सुरेश भटांना हॅट्स ऑफ!

प्रत्येक संगीतकाराची एक विशेषता असते. या गाण्यात किंवा या व्याकुळ संध्या समयी मधे विविध वाद्यांमुळे (orchestra) जो एक larger than life परिणाम साध्य होतो ती नरेंद्र भिडे या संगीतकाराची विशेषता. वेगळा विचार करून परिणामकारक संगीत देणं ही नरेंद्र भिडेची ओळख होती. हरिश्चंद्राची फॅक्ट्री हा त्याच्या संगीतकार या नात्याने केलेल्या प्रवासातला मैलाचा दगड. आपल्याला थेट 'प्रभात' च्या युगात घेऊन जाणारं शीर्षक संगीत इतकं गाजलं की अनेक लोकांनी आपला रिंग टोन म्हणून त्याला पसंती दिली. अर्थात या चित्रपटात नरेंद्र बरोबर, संगीताचा मोठा वाटा ज्येष्ठ संगीतकार स्व. आनंद मोडक यांनाही जातो कारण मुख्य संगीतकार ते होते. पण हरिश्चंद्राची फॅक्ट्री मधील प्रत्येक प्रसंगानुरूप दिलेलं संगीत आणि त्यातून होणार परिणाम ही या चित्रपटाची आणि त्याच्या लोकप्रियतेची महत्वाची बाजू. तसंच आनंद मोडक यांचा शेवटचा ठरलेला चित्रपट 'एलिझाबेत एकादशी' यातलही दगड-दगड गाणं आठवा त्यातला वाद्यमेळ, विविध वाद्य वापरून त्यातून निर्माण होणारी मेलोडी, संयोजकांच्या भूमिकेत पुन्हा एकदा नरेंद्र भिडे! अलीकडे आलेला मुळशी पॅटर्न, देऊळ बंद, उबंटू (पार्श्व संगीत) आणि सरसेनापती हंबीरराव मोहिते हा चित्रपटही नरेंद्र भिडेचा.

शिक्षणाने सिव्हिल इंजिनियर असलेल्या नरेंद्र भिडेनी नोकरी जॉईन करायच्या एक दिवस आधी मी जॉईन करणार नाही, असा निरोप पाठवून नोकरीला रामराम केला आणि संगीत हेच आपल क्षेत्र निवडलं. त्याच्या हजरजवाबी बोलण्यासाठी आणि मिश्किलीसाठीही नरेंद्र भिडे संगीत क्षेत्रात प्रसिद्ध होता. एका मुलाखतीत मुलाखतकाराने प्रश्न विचारला, "तुला इंजिनियरिंग चं बॅग्राऊंड आहे ना?" त्यावर क्षणाचाही विलंब न लावता त्यानं उत्तर दिलं होतं, "हो बॅग्राऊंड काय, इंजिनियरिंग बॅग्राऊंडलाच होतं बाकी आम्ही फिरोदिया, पुरुषोत्तम आणि इतर यांच्यातच जास्त गुंतलेले असायचो"

फक्त संगीतकार न राहता पुण्यात अद्ययावत ध्वनी मुद्रणाची सोय असली पाहिजे म्हणून अनेक खटपटी करून स्वतःचा स्टुडियो निर्माण केला. डॉल्बी डिजिटलचं प्रमाणपत्र मिळवायला मुंबईचा हेलपाटा नको म्हणून डॉल्बी डिजिटलचं प्रमाणपत्र पुण्यातच मिळेल याची सोय आपल्या स्टुडियोत करून पुण्यातल्या संगीत क्षेत्रातल्या अनेकांनी सुखाचा निश्वास सोडला. नरेंद्र भिडेंसारखे संगीतकार अत्यंत अभ्यासू वृत्तीने चिरकाल टिकेल असं संगीत निर्माण करतात. एखाद वेळी नरेंद्र भिडे हे नाव कदाचित लक्षात राहणार नाही पण त्यानं निर्माण केलेलं संगीत येणारी अनेक वर्ष संगीत प्रेमी ऐकत राहणार यात शंका नाही.
माझ्या लाडक्या संगीतकाराला माझ्याकडे असलेल्या तोकड्या माहितीवर त्याला दिलेली ही छोटीशी शब्दांजली!

https://youtu.be/4UWdd890v1I (कॉसमॉस बँकेची ती प्रसिद्ध जाहिरात)
https://youtu.be/8XPrnmNWEXM (त्या पैलतीरावर मिळेल मजला थारा...)



**अमोल दांडेकर**



# ओये, आग्वा!

निकराग्वाला भेट देऊन सोळा वर्षं होऊन गेली पण तिथे घडलेल्या गमतीजमती आठवून आम्ही आजही हसतो.  निकराग्वाला जायचं कारण म्हणजे माझ्या नवऱ्याची, अँड्रूची बहीण केटी आणि तिचा नवरा टेड, तिथे एक रिजॉर्ट चालवत होते.

रिजॉर्ट एका टेकडीवर वसवलं होतं. एक मुख्य इमारत होती, जिथे स्वयंपाकघर, जलतरण तलाव, आणि पार्ट्यांसाठी मोठ्या खोल्या होत्या. बाकी झोपायच्या खोल्या म्हणजे पन्नास एक छोटे बंगले होते. आम्ही दोघे एका बंगल्यात उतरलो पण आमचा सगळा वेळ मुख्य इमारतीत तलावाशेजारी केटीच्या नवऱ्याबरोबर आणि चार पैकी तीन मुलांबरोबर म्हणजे क्रिस, आनी, आणि मायकल बरोबर जायचा.

## पोलीस खाते

पहिल्याच दिवशी क्रिसने निकराग्वातील आलेले त्याचे अनुभव सांगितले आणि हसुनहसुन आम्ही अगदी बेजार झालो. तो म्हणाला, “इथलं पोलीस खातं अजब आहे. अमेरिकेत कसं काही निकडीचा प्रसंग उद्भवला तर आपण पोलिसांना फोन करतो आणि ते लगेच येतात. इथे पोलिसांना फोन केला तर ते ‘पेट्रोलचा इतका खर्च येईल, देणार असाल तर येतो’ असे सांगतात. निकराग्वात खूप गरिबी आहे. पेट्रोलचा खर्च गरिबांना कसा परवडणार? म्हणून ते बिचारे पोलिसांना बोलावण्याचा भानगडीतच पडत नाहीत!” पोलिसांच्या ह्या वागण्याचा समाजव्यवस्थेवर काय परिणाम होत असेल याचा आम्ही विचार करून गंभीर झालो म्हणून क्रिस म्हणाला, “बरं, आता एक प्रत्यक्षात घडलेली गंमत ऐका”.

“मनाग्वा हे शहर राजधानी आहे. मी तिथे एक वर्ष काढलं. तिथे माझ्या एका अमेरिकन मैत्रिणीनं वाहतुकीचा लाल दिवा दिसत असताना त्याचा भंग करून गाडी चौकातून पुढे चालवली. चौकातल्या पोलिसानं तिला थांबवायचा प्रयत्न केला पण तिने गाडी जोरात पुढे नेली. तो चिडला पण त्याच्याकडे गाडी नव्हती. तो पटकन एका टॅक्सीत बसला आणि तिचा पाठलाग करू लागला. पुढच्या चौकात पुन्हा वाहतुकीचे दिवे लाल झाले आणि आता तिनं आपली गाडी थांबवली. पोलिसाने टॅक्सीतून उडी मारली आणि तिच्या गाडीच्या खिडकीवर थाप मारली. त्याला पाहून तिने परत आपली गाडी जोरात हाणली. हे पाहून त्यालाही चेव आला आणि त्याने परत टॅक्सीतून तिचा पाठलाग सुरु केला. असे बऱ्याचदा झाले. पण तोही आता इरेला पेटला होता आणि पाठलाग करत राहिला.

ती एका मॉलमध्ये शिरली आणि गाडी लावून दुकानांकडे जाऊ लागली. शेवटी पोलिसाने तिला पायी गाठले आणि म्हणाला की मी तुला अटक करणार आहे. तर त्या बाईनं काय म्हणावं? ती म्हणाली की तिची केस कापायची अपॉइंटमेंट आहे तर नंतर अटक करशील का? तो बावळट हो म्हणाला आणि तिच्याबरोबर मॉलमध्ये फिरत राहिला. तिने आपले केस कापून घेतले आणि इतरही काही कामं केली. तोपर्यंत संध्याकाळचे पाच वाजले. पोलीस म्हणाला, “माझी ड्युटी संपली” आणि तिला अटक नं करता निघून गेला!” काय म्हणावं असल्या पोलीस खात्याला!

## फ्रान्स्वा

रिजॉर्टचा मुख्य आचारी ‘फ्रान्स्वा’ एक लालबुंद चेहेऱ्याचा जाडजूड बुटकासा अल्जीरियन माणूस होता. तो कुणाचंच ऐकायचा नाही. आणि स्वारीला रागही लगेच यायचा. केटी आणि टेड मालक असूनही त्याला दबकून असायचे. मी घाबरत त्याला सांगितलं की मी शाकाहारी आहे तरी माझ्यासाठी प्रत्यके जेवणाला काहीतरी वेगळं करावं लागेल. त्यानं चक्क माझी विनंती म्हणजे आव्हान मानलं आणि मला रोज एकेक चविष्ट प्रकार अगदी प्रेमानं खाऊ घातला! तो जरा माणसाळाय असं वाटून टेडनं दुपारच्या जेवणानंतर वेटरकडून चॉकलेट मूस मागवलं. तर फ्रान्स्वानं वेटरकडून त्या दिवसाचा जेवणाचा छापील बेत पाठवला आणि विचारलं की ह्यात तुला चॉकलेट मूस कुठे दिसते आहे का? बिचारा टेड! त्याने मुकाट्याने ऐसक्रीम खाल्ले आणि चूप बसला!

सगळ्यांनी मेंदीची मागणी केली होती म्हणून मी निकराग्वाला मेंदी घेऊन गेले होते. एक दिवस ढीगभर मेंदी भिजवली आणि सगळ्यांना मेंदी लावली. आनीनं हातावर नक्षी काढून तर घेतलीच पण केसांनाही मेंदी लाव म्हणाली. तिच्या सोनेरी केसांना लाल झळाळी आली आणि ती एकदम खुश झाली. छोट्या मायकलनं हातावर आपलंच नाव हिंदीत नाही तर ‘हिंदू’ मध्ये लिहून घेतलं. केटीनं अंगठी आणि ब्रेसलेटचं चित्र काढून घेतलं. त्याच दिवशी अँड्रूचा दुसरा एक भाचा एरीक पण आला होता. तो जगभर बॅकपॅकिंग करत हिंडत हिंडत  निकराग्वाला पोचला होता.

त्याला मेंदीची गरज नव्हती कारण डासांनी त्याच्या हातापायांवर इतके चावे घेतले होते की त्यानंचा त्याचे हातपाय रंगले होते!

सगळ्यांना हवी होती तशी मेंदी लावून मी आवराआवर करू लागले तर फ्रान्स्वा स्वयंपाकघरातून धावत आला आणि म्हणाला, “माझ्या हातावर ‘शेनी’ लिही. हे माझ्या लहान मुलीचे नाव आहे”. त्याचा हा अवतार नेहमीपेक्षा फार वेगळा होता; तो चक्क प्रेमळ बाप होता तर! हातावर शेनी छानच रंगली आणि मग तो मला आणखीनच चांगला वागवू लागला.

दुसऱ्या दिवशी रात्रीच्या जेवणात त्याने माझ्याकरता 'रॅटटुई' हा फ्रेंच प्रकार केला. रॅटटुई म्हणजे अनेक भाज्या आणि टोमॅटो घालून केलेला रस्सा. आणि त्याच्या बरोबर जाड मक्याची भाकरी! त्या फ्रेंच-अल्जीरियन स्वयंपाक्यानं केलेली भाकरी आणि भाजी मी मिटक्या मारत खाल्ली! असली रॅटटुई मला परत कुठेही मिळाली नाही. अँड्रूला वाटले, चला हा आपल्या बायकोवर खुश आहे तोपर्यंत आपण ही 'पिकांटे' सॅमन म्हणजे मसाले घातलेला तिखट सॅमन मासा मागवावा. पण 'पिकांटे' सॅमन ऐकताच फ्रान्स्वा भडकला! फ्रेंच पाककृतीत मिरची! हरहर! असा त्यानं अवतार धारण केला!

## गरिबी आणि काळे गोरे

निकराग्वा उष्णकटिबंधातील देश आहे. डोंगर, नद्या, समुद्र ह्या नैसर्गिक सौन्दर्याबरोबर सुखद हवामान असल्याने इथलं जीवन खरं म्हणजे फार सुखी असायला हवं पण इथे गरिबी खूप आहे. हा देश १८२१ पर्यंत स्पेनच्या अधिपत्याखाली होता. १९०९ ते १९३३ अमेरिकेने निकराग्वाचा ताबा घेतला. १९६० ते १९९० ह्या काळात तिथे क्रांती झाली. परकीय सत्तेखाली खूप वर्षं राहिल्यामुळे इथे युरोपिअन लोकांचा खूप प्रभाव आहे. तद्देशीय लोक गरीब आहेत आणि युरोपिअन लोकांचे वंशज श्रीमंत आहेत. रिजॉर्टमधे मजा करायला आलेल्या लोकांमध्ये आणि स्थानिक निकराग्वन लोकांमध्ये गरिबीमुळे जमीन-अस्मानाचा फरक दिसून येत होता.

एका संध्याकाळी तिथल्या स्थानिक महापौरांची रिजॉर्टमधे पार्टी होती. त्यांनी तलावाशेजारची जागा आणि पार्टीच्या दोन्ही खोल्या घेतल्या होत्या. अँड्रू आणि मी इतरांना भेटायला संध्याकाळी पाचच्या सुमाराला ऑफिच्या इमारतीतकडे गेलो. दारापाशी दोन माणसं उभी होती. त्यांनी अँड्रूला आत जाऊ दिलं पण मला जाऊ देईनात. त्यापैकी एकजण स्पॅनिशमधे म्हणाला, "पार्टी चालू आहे. म्हणून आत जायची परवानगी नाही". अँड्रूकडे बोट करून मी इंग्लिशमधे म्हणाले, "मग त्याला का जाऊ दिलं?" अँड्रूनं इंग्लिशमधे त्यांना समजवायचा प्रयत्न केला की ही माझी बायको आहे. त्यांना बहुतेक काही समजलं नाही. ते मला आत जाऊ देईनात. मग अँड्रू केटीला घेऊन आला, ती त्यांच्याशी स्पॅनिशमध्ये बोलली आणि मग मला आत जाता आलं. गोऱ्या कातडीची किंमत मला परत एकदा कळली! निकराग्वातल्या ऐंशी टक्के लोकांना कसं वागवलं जातं ह्याची प्रचिती आली.

त्याच संध्याकाळी केटीने जॅक हा एक नवा पोरसवदा वेटर ठेवला होता. तो अमेरिकन होता आणि मिळतील ती कामं करून बॅकपॅकिंग करत जगभर हिंडण्याचा त्याचा विचार होता. निकराग्वा त्याचा पहिलाच देश होता. दारापाशी घडलेल्या प्रकारानंतर आम्ही ऑफिसमध्ये केटीबरोबर गप्पा मारत बसलो होतो. जॅक एकदम ऑफिसचं दार धाडकन उघडून आत आला. रागानं त्याचा चेहेरा लाल झाला होता. त्याला शांत करत केटीनं विचारलं, "काय झालं?" तो म्हणाला, "मी पार्टीत कुणाला काय हवंनको ते पाहत होतो. तर एका माणसानं मला 'ओये! आग्वा!' अशी हाक मारली! मी काय त्याचा नोकर आहे का अशी हाक मारायला? आणि पाणीच हवं होतं तर सामान्यपणे जसे लोक पाणी मागतात तसं का नाही मागितलं?" तो अगदी घायकुतीला आला होता.

अमेरिकेत आपण वेटर लोकांनाच काय पण कुणालाही ‘ओये’ म्हणून हाक मारत नाही. पण इथली सामाजिक व्यवस्था अशी आहे की गरीब माणसांना तुच्छतेने वागवतात. बिचारा जॅक! जगात कमी दर्जाचं काम करणाऱ्यांना कशी वागणूक मिळते ह्याचा त्याला अनुभव आला होता आणि तो चांगलाच हादरला होता! केटीनं त्याची समजूत काढली की इथे वेटरांना अशीच वागणूक मिळते. आपण त्याकडे दुर्लक्ष करावं असा सल्ला ही दिला. ती म्हणाली, “डोन्ट टेक इट पर्सनली”. म्हणणं सोपं आहे पण...

**वासंती मुदकण्णा**



# शाबासकीची थाप

आई चालती बोलती होती तेव्हा सतत काही ना काही करत असे... शांत बसलेली किंवा झोपून राहीलेली आम्ही तिला कधीच पाहिले नाही... आम्ही तिला कामकरी मुंगी म्हणत असू... ती त्याला छानसं हसून दाद देत असे... नंतर वयामुळे तिला काम उरकेनासे झाले... वस्तू हातातून पडू लागल्या... तिला माझ्या घरी घेऊन आले... फार पटवावे लागले... चार दिवस चल मग ये परत बरं वाटलं की... तेव्हा कुठे होकार भरला आणि स्वारी घरी आली...

शेवटची काही वर्ष माझी आई अंथरुणावर फक्त उठून बसू शकत होती... चालणे-फिरणे बंदच झाले होते... आज खूप विचारात दिसली... विचारले तर म्हणाली, अगं, जरा शाळेत जाऊन आले... कुमुद आणि सुवर्णाला भेटले... आमच्या वर्गात बसलो होतो आम्ही... आणि कुठे कुठे गेलात तुम्ही... ती गोंडस हसली... या तिघींचे शाळेत असताना फार गुळपीठ होते...

एक दिवस कुमुद आणि सुवर्णा मावशी च्या घरी जाऊन त्यांना सांगितले उद्या आपण आईला भेटायला जाऊ... मी तुम्हाला घ्यायला येते...

त्यांना घ्यायला गेले तर दोघींच्या हातात डबे... काय ग हे मावशी... अगं, तुझ्या आईला माझ्या खोबरेपाकाच्या वड्या आवडतात आणि हिच्या बिरड्या, ते घेतलंय... किती निर्व्याज प्रेम हे...

मग आम्ही रिक्षाने  घरी आलो... आईला नव्हतं सांगितलं...

दोघींनाही आईसमोर उभं केल्यावर तिच्या चेहऱ्यावरचा अपार आनंद आणि आश्चर्य फार सुंदर... फोटो काढायला पण सुचलं नाही मला... आश्चर्याचा बहर ओसरल्यावर तिघी एखादा जुना खजिना गवसल्या सारखं खूप काय काय बोलत होत्या... आम्ही आजूबाजूचे कोणी खिजगणतीतही नव्हतो त्यांच्या... वेगळ्याच जगात वावरत होत्या त्या तिघी... टाईम मशीन ने काही वर्ष मागे गेलेल्या होत्या... कोणता विषय नव्हता त्यात... शाळा, वर्ग, बाई, शिवणकाम, भरतकाम, मुलेबाळे असे अनेक... खूप वेळ गप्पा झाल्या... आणलेला खाऊ खाल्ला...

निघताना निरोप घेताना डोहभरल्या डोळ्यांनी काय बोलल्या असतील... परत भेटीचे आश्वासन का परत भेटू का नाही ही भीती... मी पण डोळे पुसत रिक्षा आणायला गेले... परतीच्या प्रवासात दोघीही गप्पच होत्या... उतरताना म्हणाल्या फार छान काम केलेस आज...

घरी आल्यावर आई म्हणाली, बयो, आज मी खुप समाधानी आहे, माझ्याकडे पाठ करून बस... मी बसले तर तिची शाबासकीची थाप पडली पाठीवर... म्हणाली आज माझा दिवस फार छान गेला...

अजून आठवण आली की ती शाबासकीची थाप पुन्हा अनुभवते आणि आई पाठीशी आहे हे जाणवते...

**स्वामिनी बाबतीवाले**



# पहाट पाऊल

पहाट हळूहळू उमलायला  लागली,उषेच्या गुलाबी तळव्या आडून उन्हाच्या सोनपरीने आभाळातून अलगद खाली डोकावून पाहिले,तिचा सोनेरी रंगाचा झगा वाऱ्याच्या झोतावर अलवार हलला, तिचं सोनेरी केस वाऱ्यावर अलगद हलले आणि नाजूक रेशमी पंखांची तिने अलगद उघडमीट केली.तिच्या गुलाबी कोमल पायांमधले सोनेरी पैंजण हलकेच किणकिणले,तिची उत्सुक नजर उंचच उंच झाडांच्या शेंड्यावर पडली,वाऱ्याच्या  टिचकी वर शेंड्यावरची तांबूस,नुकतीच जन्मलेली पाने डुलत होती,लाल आणि श्वेत चाफ्याचे झाड एखाद्या कमनीय पण ठेंगण्या ठुसक्या नर्तकी प्रमाणे आपल्या डौलदार फांद्या फैलावून आणि डोक्यावर फुलांचे मुगुट घालून देखण्या युवती प्रमाणे दिसत होते.पांढऱ्या चाफ्यावर कळ्यांचे घोस लगडले होते आणि नुक्त उमलू पहाणाऱ्या फुलाच्या मुठी अलगद उलगडत होत्या,पूर्ण उमललेल्या फुलाची कड पिवळसर सोनेरी आणि पराग गाभा सुद्धा तसाच सोन पिवळा आणि लाल चाफ्यात सुद्धा मधेच एक सोनेरी जरीची काडी..

मधमाशीने तिचे लांब सडक पाय फुलाच्या पाकळीवर टेकवले, मधुसंचय बघून तिचे पिवळे बटबटीत डोळे चमकले तिने पुढचे पाय एकमेकावर घासले आणि सोंडेची गमतीदार हालचाल करत तिचे काम तिने चालू केले, मोठे डोके असलेला काळसर मुंगळा दगडावरून चालायला लागला,आणि जणू पर्वतारोहण करायचे समाधान त्याला मिळाले,कुठल्या तरी अगम्य दिशेला तो चालू लागला. जमीनीतल्या एका अगदी छोट्या छिद्रातून लाल मुंग्यांची पलटण अगदी शिस्तबद्ध रीतीने बाहेर पडली,छिद्रात येणारी एक रांग आणि बाहेर पडणारी एक.त्या मुंग्या एकमेकींच्या डोक्याला डोके घासून काही संदेश देत होत्या,तेव्हढ्यात एक मृतप्राय जाड आणि जड किडा त्यांच्या रडार वर आला,आणि सगळ्या जणीनी मिळून त्याला घेरले,आणि एकदिलाने त्या आपल्या वारुळा कडे त्याला घेऊन निघाल्या,त्यांची शिस्त बघून परीला मजा वाटली .मग तिने बघितले की पिवळ्या चोचीच्या साळुंकीने आपल्या पिवळ्या पायाने गवतावर चालत किडे मटकवायला सुरुवात केलीय.

झुडपाखाली तळातल्या गवतावर हिरवे काळ्या ठिपक्यांचे आणि पंखांवर किंचित काळसर किनार असलेले फुलपाखरू बागडताना बघून उन्हाच्या सोनपरीचे डोळे लकाकले, बुलबुलची जोडी काटक्या चोचीत धरून झाडाच्या दुबेळक्यात दिसेनाशी झाली, आणि पोपटाच्या पिल्लांनी एकच धुमाकूळ घातला,लांब बाकदार चोचीचा आणि लांब सडक शेपटीच्या धनेश पक्ष्याने झाडाच्या वाकलेल्या फांदीवर पाय टेकले आणि स्वतःचा तोल सांभाळण्यासाठी शेपटीची मजेदार हालचाल केली.

हे सगळं बघताना चिमुकल्या परीला एकदमच मजा वाटायला लागली.तिने आपली सोनेरी थिरकणारी पावलं पानांच्या गुलाबी तांबूस तळहातावर ठेवली,मजेत एक गिरकी घेतली तिचा सोनेरी झगा चमकून उठला,तिने चाफ्याच्या फुलाला  गुदगुल्या केल्या,फूल हसतच उमललं,पोपटाच्या पिल्लांबरोबर लपाछपीचा खेळ खेळला आणि त्यांचे माणकाच्या रंगाचे डोळे लकाकून उठले,फुलपाखराच्या पंखांवर तिने हळूच फुंकर घातली,आणि पंखावरचे काळे ठिपके चमकून उठले, तरतर चालणाऱ्या मुंगळ्या समोर तिने आपल्या हातातल्या किरणाच्या छडीने एक रेघ ओढली आणि त्याला त्याची दिशा सापडली.मग तिने आपल्याकडे असलेला जादूचा आरसा सगळ्या जगाला दाखवला,सगळीकडे उजाडलं...
परीने आकाशात भरारी मारली आणि आकाश हसलं अगदी निळं निळं लख्ख....

**ऋचा सावरकर**



# गोष्ट नर्मदालयाची

ग्रंथ तुमच्या दारी ची पुस्तक पेटी चाळत होते. दोनतीन पुस्तकं वाचायची म्हणून बाहेर काढून ठेवली. एक होत शिरीष कणेकर यांचं "लता" तर दुसरं "गोष्ट नर्मदालयाची" म्हणून भारती ठाकूर यांचं. लता वाचायला घेतलं, पण थोडी पाने वाचून झाल्यावर कणेकर त्याच त्याच प्रसंगांची पुनरावृत्ती करतं आहेत असे वाटले. तेच तेच प्रसंग, जवळ जवळ पाणी घालून परत परत पुढच्या चॅप्टर मध्ये. परत यात माझे लता मंगेशकर यांच्याशी किती घनिष्ठ संबंध होते हे दाखविण्याचा अट्टाहास वाटला. तसे कणेकरांचे बरेच लेख मला आवडतात . पण हे पुस्तक मात्र फार वाचवले नाही.

मग गोष्ट नर्मदलायाची वाचायला घेतले. आईकडून हल्ली नर्मदा परिक्रमेचा उल्लेख बऱ्याचदा ऐकला होता. तिला पुस्तकाबद्दल सांगितले तर ती म्हणाली की अग भारती ठाकूर आपल्या  बिल्डिंग च्या खालच्या मजल्यावर असलेल्या विवेकानंद केंद्रात यायच्या. आपल्या दुकानातही आल्या आहेत बऱ्याचदा. मग मी पुस्तकाच्या मागचा फोटो पाहिला. आणि मला चक्क इतक्या वर्षांनी त्यांचा चेहरा आठवला. पुस्तक वाचायला घेतलं, आणि त्यानंतर रोज log out केल्यावर पुस्तकाकडे हात आपोआप जायला लागला. नर्मदा काठी वसलेल्या बैरागगढ आणि आजूबाजूच्या गावांमध्ये भारतीताई नी सुरू केलेल्या नर्मदलयाची ही स्तिमित करणारी कहाणी आहे. सुरुवातीला छोट्या मुलांना केवळ लिहिता वाचता यावा म्हणून  २०१० साली सुरू केलेल्या  शाळेचे आता NARMADA या मोठ्या संस्थेत रूपांतर झाले आहे. त्याची ही गोष्ट. अतिशय साध्या सोप्या शब्दात सांगितलेली. तरीही वाचताना कधी या क्षेत्रातील लहान मुलांना अन्न,  शिक्षण या साध्या गरजा किती दुर्मिळ आहेत हे वाचून डोळ्यात पाणी येते, तर त्यांची या सगळ्या गोष्टींकडे पहायची जीवन हेच शाळा ही दृष्टी पाहून मन भरून येतं. चांगुलपणाच्या आणि दातृत्वाच्या गोष्टी वाचून अंगावर शहारे येतात. भारती ताईंची "सखी" या पुस्तकात वारंवार येते. त्यांच्या या सर्व कार्याला तिच्या अध्यात्मिक नजरेची बैठक आहे. त्यामूळे कार्य करतांना आपण निमित्तमात्र आहोत, कर्ता करविता "तो" आहे हा भाव सतत दिसतो. अहं भावाचा लवलेशही वाटत नाही. अनेक हृदयस्पर्शी घटनांची  गुंफण आहे. संस्कृत सुभाषितांचा छान वापरही आहे. नर्मदालयाची माहिती म्हणून सुंदर पुस्तक आहेच पण अतिशय वाचनीयही आहे.

लहानपणी  राणी लक्ष्मीबाई शाखेत आदी शंकराचार्यांचे निर्वाणषटक म्हणून घेत. अर्थातच संस्कृत उच्चारण पाठोपाठ म्हणताना तारांबळ होई.  या पुस्तकाचा शेवट त्यानेच केला आहे.
।। चिदानंद रूपः शिवोहम शिवोहम ।।






**शिल्पा साठे**



# पहिला पाऊस

पहिल्या पावसात भिजण्याची , मजाच काही और
अंगावर थेम्ब घेण्याची , ती तर्हाच काही और
दरवेळी नव्याने पहिला पाऊस खुणावतो
अंगावर तुषार उडवत हलकेच रोमांच उठवतो
मोराच्या पिसाप्रमाणे स्पर्श असतो त्यांचा
वाटतो हा काळ आता आपली निवड करण्याचा
पावसात भिजायला कोणीतरी हवं असतं
त्याची वाट पाहत मन अगतिक थिरकू लागत
कोण कसा अचानक मनात गुंतून जातं
अगदी हलकेच रुंजी घालत गुणगुणू लागतं
असे दोन धुंद जीव नकळत एकत्र येतात
तेव्हाच कळतं पहिल्या पावसाळा बेधुंद का म्हणतात .....


**प्रविणा पाठक**



# नातं तुझं माझं

नातं तुझं माझं
आळवाच्या पानावरील थेंबासारखे
स्वच्छ पाणीदार
काहीही न सांगता बरच काही सांगून जाणारं
नातं तुझं माझं
श्रावणातल्या ऊन पाउसा सारखे
कधी खळाळून हसणारे
तर कधी आपल्याच विश्वात हरवलेले
नातं तुझं माझं
आकाशातील तारकेसारखे
निरभ्र आकाशात खुलून दिसणारे
आकाशाचे सौन्दर्य वाढविणारे
नातं तुझं माझं
काहीच कळत नाही
मैत्रीचे , प्रीतीचे कि
अजूनही त्या नात्याचं अर्थ शोधणारे
पण नातं तुझं माझं
विश्वासाच्या , मायेच्या आणि आपुलकीच्या बंधनात बद्ध झालेले
नातं तुझं माझं

**रसिका राऊत**



# अलगूज

भावमनीचे  अलगूज, हितगुज,
सांगाया, असे वसुधा आतुर
'क्षणसय' ती नयन दर्पणी,
"सहजसख्या'ची आर्त 'वाटुली' !

अवचीत येउनी लाटेसरशी
झोकुन देई किनाऱ्याशी
शिरशिरी गोड वाऱ्याची
अवखळ लहर मस्तीची !

जलाशयाचे जलही नितळ
बिंब पहाता तयाचे कातळ ,
नीरक्षीरेची भरली दुथडी
खेळायासंगे लाट लालडी !

आकाश मिळे क्षितीजाला
तैसे सागर 'मिलन', वसुंधरेला,
स्वच्छ पांढऱ्या फेसाळती लाटा
खडकावरी, फुटती लाह्या !

कडेकपारीतुनी शिंपले  'गुलाबपाणी',
स्वागता ! सख्याच्या , नटल्या वृक्षपर्णी !

'पानझडी' च्या या हिरव्या रानी,
येशील का ? माघारी परतोनी
'सांजपूनव' जाईल उजळोनी !

जयश्री मुळे



# बेघर

बेघर मी, बेघर मी,
असा कसा झालो अनाथ मी!

आई होती, बाप होता,
भाऊ होता, बहीण ही होती,
पण कुणाचीच कुणाला
तमा नव्हती!

धष्टपुष्ट होतो मी, बुद्धिमान होतो मी
पण दृष्ट लागली दुष्टांची
मार्गदर्शनाची गरज होती,
पण घात केला आप्तांनीच!

लष्कराने व्हिएतनामला धाडायला नकार दिला,
समलैंगिक म्हणून धिक्कार केला
मग लागली समलैंगिकांची रांग,
पण काही मुलीही होत्या दिसायला छान!

एक दिवस डॉक्टरला साक्षात्कार झाला
म्हणाला, स्कित्झोफ्रेनिआने पण आघात केला
कुठेकुठे लावू ठिगळ आकाशाला
काय गरज आहे माझी जगाला?

कोण होतो मी समजायला मार्ग नव्हता
बुद्धिमत्तेचा आता काही उपयोग नव्हता
रागाचा पारा क्षणात वर जायचा
आणि शरीरावरती जखमा सोडायचा!

असेच एकदा डोक्यावरचे छप्पर फाटले
पायाखालची जमीन धसली
एक सतरंजी पदपथावर अंथरली
बेघर होऊन सारी लक्तरं उघडी पडली!

वडील गेले, बहीण गेली
आयुष्याची साठी उलटली
पांगुळगाड्याविना चालता येईना
वाया गेलेल्या आयुष्याचा हिशेब जमेना!

बेघर मी, बेघर मी,
असा कसा झालो अनाथ मी!

**वासंती मुदकण्णा**



# पाककला

शेवग्याच्या शेंगांचे सूप/पानांची भाजी व शेवग्याच्या शेंगा फ्राय पाककृती

मला यावेळी इंडिया बझ्झारमधे अचानक शेवग्याच्या शेंगांच्या पाल्याची जुडी मिळाली पण शेंगा मात्र जरा उशिरानी मिळाल्या.
योगायोगानी श्री राजन सानेची गर काढायची पध्दत मिळाली व त्याच पध्दतीने अख्ख्या शेंगांचे तुकडे करून थोडीफार साल काढून मीठ व हळद घालून उकडून घेतल्या . प्रथम शेंगांचा गर चमच्यानी निपटून त्याची पेस्ट केली. साले पाण्यातून नीट कोळून घेतली मग पहीले बाजूला काढलेले उकळीचे पाणी व साले पेस्ट केली गाळून घेतली त्यामुळे छोट्या लिंबाएवढाच चोथा निघाला.मोठे बाऊलभरून गर होता त्यामुळे सूपचे तीन प्रकार केले व पाल्याची भाजी, दोन शेंगा सूपमधे व शेंगा फ्राय करायला वापरल्या.
नेहमीसाठी अगदी साधे सूप म्हणजे गर हवा तेव्हढा पातळ करून सैंधव व मिरपूड टाकून गरमागरम घेणे.

(१) शेवग्याच्या शेंगा गराचे सूप
मी कुकरमधेच तुपावर जिरे , कांदा, लसूण, २-४ मिरीदाणे, आले पातळ काप / किस , दुधी भोपळ्याचे फोडी परतवून घेतल्या  मग ओले खोबऱ्याचे काप टाकले जरासे परतवून गर व पाणी  आपल्याला सूप पातळ वा घट्ट किती हवे त्याप्रमाणांत टाकल्या, दुधी लगेच शिजतो ( खातेवेळी चव बघूनच सैधव व मिरपूड हवी तशी टाकणे )

(२) शेवग्याच्या शेंगा गर व पाल्याचे सूप
या सूपांत मी थोड्याची पेस्ट  व कमी पाण्यांत उकडलेली पानेपण वापरली. कुकरमधे तुपावर लसूण पातळकाप, कांदा पातळ काप व फ्रोजन पॅकमधील मटार गाजर फरसबी टाकली, हिंग टाकून परतवले मग आपल्या आवडीनुसार गर व पाणी घालून शिजवले. गरम सुपावर थोडे साजूक तूप व लिंबूरस टाकून घ्या छान चव लागते .

(३) शेवग्याच्या शेंगा गर ,पाने , शेंगाचे सूप - रसम पावडरसह
हे सूप रसम पावडर , चिंच गूळामुळे खूप चवदार लागते.या सूपसाठी वेगळे ठेवलेले शेंगेचे तुकडे तसेच तूरमसूरमूग डाळ प्रत्येकी चहाचे चमचाभर भिजवून ठेवलेल्या वापरल्या, १/२ सालीसह बटाटा तुकडे तसेच १/२ लाल टोमॅटो तुकडे (मधला भाग काढून )वापरले.रसम तयार पावडर व १-१/२ च चमचा ताजा नारळ चव वापरला .

कुकरमधे तुपावर कढिपत्ता ,कांदा लसूण काप परतणे मग आले काप टाकणे थोडे परतवून भिजलेल्या डाळी पाणी निथळून टाकणे परतवणे त्यांत सालासह तुकडे केलेला बटाटा , टोमॅटो तुकडे टाकणे टोमॅटो परतवून मऊ झाल्यावर, शे शेंगाचे तुकडे , थोडी पाने , चिंचकोळ गूळ व ओला नारळ चव, एव्हरेस्टचा रसम पावडर चवीनुसार टाकून मग तयार गर आणि पाणी घालून पातळ करून शिजवून घेणे. ह्या सूपमधे शेंगांचा गर ,पाने होतीच पण खातानां शेंगा चोखूनही खायची मजा घेता आली.

४) शेवग्याच्या शेंगांच्या पाल्याची भाजी
ही दाक्षिणात्य पध्दतीने केली, कोवळी पाने कमी पाण्यात मीठ हळद घालून उकडून घेतली. हरबरा व मूगडाळ पाण्यांत भिजत ठेवलेली १ च चमचा प्रत्येकी वापरला.पाणी काढून न टाकता पाला वापरायचा आहे.
तुपावर जिरे मोहरी कढिपत्ता सुकी लाल मिरची ( बी काढलेली) कांदा व लसूण बारीक चिरून टाकला , आले पातळ काप करून परतवले मग डाळी व पाण्यासह उकडलेला पाला टाकला. चांगली वाफ आणा चव बघून मीठ तिखट सारखे करणे , ओला नारळ चव टाकून भाजी परत एकदा ढवळून घेणे.

(५) शेवग्याच्या शेंगा फ्राय
हा प्रकार प्रथमच केला १ उकडलेली शेंग शक्य तेव्हढी साल काढून मीठ लावून ठेवली मग बेसन, बारीक रवा तिखट टाकलेल्या मिश्रणांत दाबून घोळून घेतले कुरकुरीत केले.खातानां वरून मसाला टाकून चविष्ट लागले.

यावेळचा अनुभव:
शेंगा भजी प्रकारांत वरचे तळलेले कुरकुरीत पीठ व आंतला मऊ गर खाता आला बाकी शेंग चोखूनच खावी लागली. तसेच शेंगेचे लोणचे ,सॅलड / भरीत प्रकारांत अनुभव आला.शेंगा फ्राय प्रकारांत फक्त दोनच तुकडे पूर्णपणे खाता आले चवीला मात्र छान प्रकार लागला.
बाकी ज्येष्ठमध खाल्ल्यावर जमा होणाऱ्या चोथ्यासारखा चोथा तोंडात गोळा होतो, हरकत नाही तेव्हढीच अन्न पचन करणारी लाळपण जास्त सुटते हाही फायदाच आहे. कालवणांतील शेंग चोखून खाण्यामागचे हेही कारण असावे. सूप प्रकारांत शेंगा त्यामानानी खूप प्रमाणांत वापरता आल्या. आशा आहे की तुम्हाला रेसिपी आवडतील.














कुंदा देशपांडे

# उत्सव माझ्या दारी

## तुळशीचे लग्न





**अमरजा बाबतीवाले**

# छोट्यांच्या दुनियेत



एक हजार गोष्टीची पुस्तके वाचली किंडरगार्टेन सुरु होण्या आधी

**आरव गुंड**



# चित्रकला



Legends of the koi fish



Birch trees and Northern Lights

**आर्य पाठक**



# Northern Lights








नितीन मुळे

# मराठी शाळा











परीक्षेचे पेपर, पेन्सील , वॉटर बॅग ... अगदी आपल्या शाळेचे दिवस आठवले! मराठी शाळेची २०२३-२४ ची वार्षिक परीक्षा यशस्वीरित्या पार पडली.

27th April, 2024













**मृदुला वडके**
**शाळा सचिव**




# मराठी मंडळ कमिटी २०२२-२०२४





# दिवाळी २०२३













# संक्रांत २०२४
























# होळी आणि रंगपंचमी २०२४









# मंदार भिडे -
# स्टॅन्ड अप कॉमेडी शो











# मराठी चित्रपट







